कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक -

# प्रेस नोट

## "मिळकतकराचे धनादेश न वटल्याबद्दल करण्यात येणा-या कायदेशीर कारवाई करणेबाबत"

कर आकारणी व कर संकलन कार्यालयामार्फत प्रतिवर्षी मिळकतकर देयकांचे वाटप करण्यात येते. सदर देयकांचा विहित मुदतीत भरणा करण्याची जबाबदारी मिळकतदारांची असते. त्याअनुषंगाने जवळच्या क्षेत्रिय कार्यालयात तसेच मुख्य इमारत पुणे महानगरपालिका येथील नागरी सुविधा केंद्रात धनादेशाद्वारे मिळकतकर भरणा नागरिक करतात.

१ एप्रिल २०२५ पासून अनेक नागरिकांनी मिळकतकराचा धनादेशाद्वारे भरणा केला आहे. तथापि, सदर भरणा करताना धनादेश देताना राहून गेलेल्या धनादेशातील त्रुटीमुळे तसेच नागरिकांच्या बँक खात्यात असलेल्या अपु-या शिल्लकेमुळे तसेच इतर तांत्रिक अडचणीमुळे धानादेश वटले गेले नाहीत. तथापि, अशा मिळकतधारकांना The Negotiable Instruments Act 1881 Chapter XVII Section 138 अन्वये नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. परंतु सदर मिळकतधारकांनी अद्याप पर्यंत मिळकतीचा भरणा केलेला दिसून येत नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा मिळकतदारांवर कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येणार आहे.

तरी ज्या नागरिकांचे मिळकत कराचे धनादेश वटले नाहीत त्यांनी त्यांच्या मिळकतकराची रक्कम त्वरित पुणे महानगरपालिकेकडे जमा करावी. विहित मुदतीत सदरचा धनादेशाचा भरणा न केल्यास नियमानुसार फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

20.3.25

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका